**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - दिनकर गोविंद बोयने,

वय वर्षे - ३८, व्यवसाय - नोकरी-ग्रामसेवक,

राहणार - राणी अंकुलगा, ता. निलंगा.

**सरतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. पी.एल. नरहरे यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

१. मला सदर प्रकरणातील साक्षी समन्स मिळालेले आहे. समन्समध्ये नमूद केलेले कागदपत्र मी सोबत आणले आहे. गावात दोन मतदार याद्या आहेत. मी यादी भाग क्र.१५७ सोबत आणलेली आहे. यादी भाग क्र.१५८ बुथ लेवल ऑफिसर म्हणजेच शाळेतील शिक्षकाकडे आहे. मी आणलेल्या यादी क्र.१५७ मध्ये मनकर्णाबाई नावाची नोंद नाही. मी दुसरी यादी पाहिलेली नाही.

प्रतिवादी तर्फे सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एच.व्ही. गायकवाड यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

२. मी ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहे. मतदार यादी क्र.१५७ माझ्याकडे सोबत ठेवण्याबाबत तहसीलदार यांचा आदेश आहे. सदर आदेश मी सोबत आणलेला नाही. मला मतदार यादी आणण्याबाबत कोर्टाने समन्स काढले होते. मतदार यादी क्र.१५७ आणण्याबाबत स्पष्टपणे आदेश झालेला नव्हता. मी ज्या बुथचा ऑफिसर आहे ती मतदार यादी सोबत आणलेली आहे. मी तहसीलदार यांना पूर्ण यादीच्या मागणीबाबत कोणतेही पत्र पाठविले नाही. गावामध्ये एकुण किती मतदार आहेत हे मला माहीत नाही. आमच्या गावामध्ये एकुण किती मतदार याद्या आहेत त्याचा अभिलेख मी सोबत आणलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सोबत आणलेली मतदार यादी क्र.१५७ ही झेरॉक्स प्रत आहे, ती यादी मी अथवा तहसीलदार यांनी प्रमाणित केलेली नाही. सदर झेरॉक्स कॉपी मी तहसील कार्यालयातून आणलेली आहे. सदर यादीवर तहसील ऑफिसचा शिक्का नाही. सदर यादी दि.६/८/२०२४ रोजी प्रसिध्द केली आहे. तहसीलदार यांनी प्रसिध्द केलेली यादी मी डकवलेली आहे, परंतु त्याची तारीख आता मला आठवत नाही. सदर यादीवर कोणाचा आक्षेप असल्यास तो मागवला जातो. ते काम बुथ लेवल ऑफिसरचा असतो. यादी क्र.१५७ दि.६/८/२०२४ रोजी डकवून आक्षेप मागविला. आक्षेप मागवण्यासाठी किती दिवसाचा कालावधी असतो हे मला सांगता येत नाही. सदर कालावधी तहसीलदार ठरवतात. तहसीलदार यांनी त्यावेळेस किती कालावधी दिला होता हे मला आठवत नाही. सदर कालावधी कधी संपला होता हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आक्षेप कालावधीची मुदत संपल्यानंतर अंतिम यादी प्रसिध्द केली जाते. दि.६/८/२०२४ रोजी प्रसिध्द केलेली यादीच अंतिम यादी आहे. त्यानंतर कोणतीही यादी प्रसिध्द झाली नाही. मतदार यादी क्र.१५७ प्रसिध्द करण्यापुर्वी मी स्वतः घरोघरी जाऊन त्याची शहानिशा केली होती. मनकर्णाबाई हिचा घर क्रमांक मला माहीत नाही, कारण तिचे माझ्या यादीत नाव नाही. यादीमध्ये नाव असेल तेव्हाच आम्ही घरी जाऊन चौकशी करतो. सदर यादी पुर्ननिरिक्षण करुन

२०२४ मध्ये तयार झालेली आहे. सदर यादी कुठल्या यादीआधारे तयार झाली आहे हे मी सांगू शकत नाही. एखाद्या व्यक्तीला मतदार यादीत नाव नोंदवण्याकरीता जोरजबरदस्ती केली जात नाही. घरामध्ये व्यक्ती हजर नसेल तर त्या व्यक्तीची नोंद घेतली जात नाही. नवीन नोंदणी केलेले रेकॉर्ड मी सोबत आणलेले नाही. अंतेश्वर रामण्णा मल्लेशा यांच्या घरामध्ये कोण कोण राहतात हे मला माहीत नाही. अंतेश्वर यांचे घर नंबर मी सांगू शकत नाही, कारण त्यांचे नाव यादीमध्ये नाही. नवीन मतदाराचे फोटो आम्ही नोंदणी करताना घेतो. मी बुथ लेवल ऑफिसर असल्याबाबत आयकार्ड सोबत आणलेला नाही. मी राणी अंकुलगा गावाचा ग्रामसेवक असल्यासंदर्भात आयकार्डवर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, राणी अंकुलगा गावाचे ग्रामसेवक दुसरे असून त्यांच्यावर फौजदारी केस चालू आहे. मी जुन २०२३ पासून ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहे. माझ्याविरुध्द कोणतीही फौजदारी केस चालू नाही.

**प्रश्न-** तहसीलमधील मुळ प्रत अथवा प्रमाणित पाहिल्याशिवाय मनकर्णाबाई मतदार यादीमध्ये आहे किंवा नाही हे तुम्ही सांगू शकता का?

**उत्तर-** माझ्या मतदार यादीमध्ये तिचे नाव नमूद नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आणलेल्या मतदार यादीवर तहसीलचा सही व शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामसेवक नाही व मला मनकर्णाबाईचे नाव मतदार यादीमध्ये आहे किंवा नाही याबाबत माहीत नाही व मला मतदार यादीबाबत काहीही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अंबुलगा गावचा ग्रामसेवक नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला अधिकार नसताना व माहिती नसताना मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला तहसीलदार यांनी कधीही बी.एल.ओ. म्हणून नेमणुक केलेली नाही.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत

दि.१८/१२/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.